Maharashtra Times - 10/6/2019



# नदीसुधार 'फास्ट ट्रॅक'वर

## दरमहा आढावा घेणार असल्याचे जावडेकर यांचे स्पष्टीकरण

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'मुळा-मुठा नदी शुद्धीकरण प्रकल्पातील तांत्रिक अडचणी आता दूर झाल्या आहेत. पहिल्या टप्प्यात बाणेरमधील सत्तर टक्के काम पूर्ण झाले आहे. यापुढे प्रकल्पाचे काम फास्ट ट्रॅक मोडवर होणार असून, मी स्वतः दर महा आढावा घेणार आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात प्रकल्पातील अजून चार टप्प्यांच्या कामांचा प्रारंभ होणार आहे,' अशी माहिती केंद्रीय वन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्री प्रकाश जावडेकर यांनी रविवारी दिली.

केंद्र सरकारच्या 'राष्ट्रीय नदीसुधार योजने'अंतर्गत पुण्यामध्ये गेल्या दोन वर्षांपासून मुळा-मुठा शुद्धीकरण प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाचा आढावा घे[illegible]ी जावडेकर यांनी जिल्हाधिकारी आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक आयोजित केली होती. या वेळी खासदार गिरीश बापट, महापौर मुक्ता टिळक, महापालिका आयुक्त सौरव राव यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर जावडेकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

'पुण्यातील मुळा-मुठा नदीच्या शुद्धीकरणाचा प्रस्ताव २००४ ते २०१४ अशी दहा वर्षे केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पडून होता. पर्यावरण मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यावर मी हा प्रस्ताव मान्य करून घेतला. या प्रकल्पासाठी ८५० कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. हा प्रकल्प म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्याला दिलेली मोठी भेट आहे. गेल्या वर्षभरात प्रकल्पामध्ये काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. आता त्यावर मार्ग काढला आहे; त्यामुळे काम वेगाने सुरू होणार आहे. बाणेरमधील मैलाशुद्धीकरण प्रकल्पाशी निगर्डात ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. लवकरच मुख्यमंत्री त्याची पाहणी करणार आहेत. या शिवाय अजून यातील चार टप्प्यांतील कामांना अंतिम मंजुरीही मिळाली आहे,' असे जावडेकर यांनी सांगितले. आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच जुलैच्या अखेरीस अथवा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात या प्रकल्पांचे भूमिपूजन होणार आहे. मी स्वतः या प्रकल्पाचा दर महिन्याला आढावा घेणार आहे, असे आश्वासनही त्यांनी दिले.



खराडीच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून सोडण्यात घाणीमुळे येणाऱ्या मुळा-मुठेच्या अस्वच्छतेत भरच पडत आहे.

### 'जायका प्रकल्प नव्हे.. नदीसुधार प्रकल्प'

'मुळा-मुठा नदीचे शुद्धीकरण हा केंद्र सरकार आणि पुणे महापालिकेचा संयुक्त प्रकल्प आहे. त्यासाठी जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सीने (जायका) अनुदान नव्हे तर कर्ज दिले आहे. केंद्र सरकार हे कर्ज फेडणार आहे. पण, अनेक लोक या प्रकल्पाला जायका प्रकल्प या नावाने संबोधतात. हा जायका प्रकल्प नाही. केंद्रीय नदीसुधार योजनेंतर्गत हा प्रकल्प राबविण्यात येत आहे असे स्पष्टीकरण प्रकाश जावडेकर यांनी दिले.

### अकरा ठिकाणी मैलापाणी शुद्धीकरण

देशातील सर्वाधिक ३५ प्रदूषित नद्यांमध्ये पुण्यातील मुळा- मुठा या नद्यांचा समावेश होतो. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने या प्रदूषणाबद्दल सातत्याने 'रेड अॅलर्ट' दिला आहे. महापालिकेकडे शहरात तयार होणाऱ्या मैलापाण्याच्या शुद्धीकरणासाठी प्रगत आणि सक्षम यंत्रणा नसल्याने अनेक ठिकाणी विनाप्रक्रिया पाणी नदीत सोडले जाते. या धर्तीवर केंद्र सरकारने नदी सुधार योजनेमध्ये (नॅशनल रिव्हर कॉन्झर्व्हेशन प्लॅन) मुळा-मुठा नदीचा समावेश केला आहे. जायकाने यासाठी जानेवारी २०१६मध्ये एक हजार कोटी रुपयांचे कर्ज देण्यास मंजुरी दिली आहे. प्रकल्पांतर्गत नदी मार्गावर अकरा ठिकाणी अद्ययावत मैलापाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येणार आहे.